जलसंपदा विभागाच्या अखत्यारितील, धरणक्षेत्रानजिकच्या अतिरिक्त जमिनी, विश्रामगृहे व रिक्त वसाहती Public Private Partnership (PPP) या तत्वावर खासगी यंत्रणांकडून विकसित करणे व व्यवस्थापन करण्याबाबतच्या धोरणातील व प्रस्तावातील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी समिती गठीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांकः- बीओटी- २०१८/ प्र.क्र. ३१९/२०१८ / सिं.व्य. (म.)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक:- ०९ जुलै, २०१९

वाचा :-१) शासन आदेश क्र:- बीओटी - २०१८/ प्र.क्र. ३१९/२०१८/ सिं.व्य.(म), दि.१४.८.२०१८
२) शासन परिपत्रक क्र.नौविप/२००३/१३५९/(१५/०३)/सिं.व्य(म), दि.८.१२.२००३.
३) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाचा महाराष्ट्र पर्यटन धोरण, २०१६ बाबतचा दि. ०४.०५.२०१६ चा शासन निर्णय क्र. टीडीएस २०१५ /११/ प्र.क्र. १०२१/ पर्यटन.
४) शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचा दि. २६.०७.२०१८ चा शासन निर्णय क्र. न्यायाप्र २०१४ / प्र.क्र. १०५/ क्रियुसे- १.
५) शासन निर्णय क्र. बीओटी- २०१८/ प्र.क्र.३१९ /२०१८ /सिं.व्य.(म), दि.१७ जून, २०१९

प्रस्तावना:-

जलसंपदा विभागाच्या अखत्यारितील धरणस्थळे व विश्रामगृहे शासनाच्या P.P.P. (Public Private Partnership) या तत्त्वावर खासगी यंत्रणांकडून विकसित करण्यासाठी जलसंपदा विभागाचे धोरण निश्चित करण्याबाबचे धोरण मा. मंत्रिमंडळ समितीने दिनांक ११/६/२०१९ च्या बैठकीतील मान्यतेने व शासन निर्णय क्र. बीओटी - २०१८/(प्र.क्र.१३९/२०१८)/सिंव्य.(म.), दिनांक १७/६/२०१९ अन्वये निर्गमित करण्यात आले आहे. उपरोक्त शासन निर्णयातील अ.क्र. क (५) नुसार Standard Bid Document (नमूना निविदा पुस्तिका) (SBD) शासन स्तरावर महसूल व वन विभाग, विधी व न्याय विभाग, नियोजन विभाग, वित्त विभाग व पर्यटन विभागाच्या सहमतीने मंजूर करावयाची आहे.

२. उपरोक्त धोरणाच्या अनुषंगाने नमुना निविदा पुस्तिका तयार करतांना त्यातील अटी व शर्ती यांच्या तरतूदी अत्यंत काळजीपूर्वक तयार करावयाचे अभिप्रेत आहे. क्षेत्रीय परिस्थितीच्या अनुषंगाने देखील यात अनेक बाबींचा समावेश करणे, शासनाच्या जमीन महसूल विषयक बाबी मा. न्यायालयीन निर्देश व्यावहारिकता इत्यादी बाबींचा सर्वसमावेशक विचार ही पुस्तिका तयार करतांना करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने क्षेत्रीय समिती गठीत करुन ही नमुना निविदा पुस्तिका तयार करणे व त्यानंतर शासन स्तरावर त्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

३. उपरोक्त धोरणातील व प्रस्तावातील उद्दीष्टे साध्य करण्यासाठी पुढील प्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे.

१) समितीची रचना:-

कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव	अध्यक्ष
मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, पुणे	सदस्य
मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, नागपूर	सदस्य
मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, औरंगाबाद.	सदस्य
मुख्य अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास, औरंगाबाद	सदस्य
अधिक्षक अभियंता, ठाणे पाटबंधारे मंडळ ठाणे.	सदस्य
मुख्य लेखा व वित्त अधिकारी, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव	सदस्य
विधी सल्लागार, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव	सदस्य
प्रदेश प्रबंधक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, नाशिक	सदस्य
अतिरिक्त जिल्हाधिकारी, धुळे	सदस्य
सनदी लेखापाल, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे	सदस्य
विभागीय लेखा अधिकारी, गिरणा पाटबंधारे विभाग, जळगांव	सदस्य
अधीक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक	सदस्य
अधिक्षक अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जळगाव.	सदस्य सचिव

२) समितीची कार्यपध्दती:-

समितीचे अध्यक्ष यांनी सर्व सदस्यांची बैठक घेऊन नमुना निविदा पुस्तिका तयार करावी. यासाठी इतर राज्यात व विभागांनी अशा प्रकारच्या केलेल्या निविदांचा अभ्यास करावा. आवश्यकता भासल्यास त्यांचेशी चर्चा करावी. समीती त्यांना योग्य वाटेल अश्या या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींशी सल्ला मसलत करु शकेल तसेच संबंधित अधिकारी व व्यक्तींना बैठकीसाठी निमंत्रित करु शकेल.

३) समितीची कार्यकक्षा: -(Term of Referee)

१) नमुना निविदा पूर्व अर्हता पुस्तिका (RFQ) तयार करणे.

२)नमुना निवीदा पुस्तिका (SBD) तयार करणे.

३) नमुना निविदा पूर्व अर्हता पुस्तिका व नमुना निविदा पुस्तिका शासन निर्णयातील अ, ब व क या तीनही प्रवर्गाकरीता स्वतंत्रपणे तयार कराव्यात. (एकूण ६ पुस्तिकांच्या प्रत्येकी १० प्रती)

४) शासन निर्णय दिनांक १७/६/२०१९ मधील तरतूदी, पर्यटन धोरण २०१६ मधील तरतूदी, जमिनी भाडेतत्वावर देतांना आवश्यक त्या अटी व विविध पाटबंधारे महामंडळांच्या अधिनियमातील तरतुदी, जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतूदी, न्यायालयीन निर्देश, करार कालावधी संपल्यावर विकास कामे पुन:श्च शासनाच्या ताब्यात मालमत्ता हस्तांतरण करण्याच्या तरतुदी, कार्यपध्दती इ. सर्व बाबींचा समावेश या पुस्तिकेत करावा.

३) समितीचा कालावधी:-

समितीने १५ जुलै, २०१९ पर्यत शासनास अहवाल सादर करावा. अहवाल Hard व Soft copy मध्ये सादर करावा.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. त्यांचा संगणक संकेतांक २०१९०७०९११४१५२९६२७ असा असून डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sudhaker Nageshrao Aivale

Digitally signed by Sudhakar Nageshrao Aivale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2cc5f92716ab534e424b50ac729583cabc178f93f59c9d32f0507cd1020c53d3, cn=Sudhakar Nageshrao Aivale
Date: 2019.07.09 11:47:00 +05'30'

(सु.ना. ऐवळे)
अवर सचिव , महाराष्ट्र शासन.

प्रत :-

१) मा. राज्यपाल यांचे सचिव,
२) मा. मुख्यमंत्री महोदयांचे स्विय सहायक, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई
३) मा. अध्यक्ष/उपाध्यक्ष, विधानसभा, विधानभवन, मुंबई
४) मा. सभापती/उपसभापती, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई,
५) मा.मंत्री, जलसंपदा, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई,
६) मा.राज्यमंत्री , जलसंपदा, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई,
७) मा. विरोधी पक्षनेते, विधानसभा,मुंबई यांचे कार्यालय,विधानभवन, मुंबई,
८) मा. विरोधी पक्षनेते, विधानपरिषद ,मुंबई यांचे कार्यालय, विधानभवन, मुंबई
९) अपर मुख्य सचिव,गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
११) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१२) अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३) प्रधान सचिव (जलसंपदा) ,जलसंपदा विभाग,मंत्रालय, मुंबई,
१४) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१५) प्रधान सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
१६) प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई,
१७) सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१८) सर्व कार्यकारी संचालक, पाटबंधारे विकास महामंडळ,
१९) सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग,
२०) सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा मंडळ,
२१) सर्व उप सचिव /सहसचिव, जलसंपदा विभाग,मंत्रालय, मुंबई,
२२) महासंचालक,महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक,
२३) सिं.व्य.(महसूल) कार्यासन संग्रहार्थ.